कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग

आणि

श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर संचलित,

## पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगांव

यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित

# "आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा" – अहवाल

(दिनांक 21 जानेवारी 2025 ते 05 फेब्रुवारी 2025)

प्रा. डॉ. अस्मिता धनवंत सरवैया,
विद्यार्थी विकास अधिकारी

प्रा. डी. आर. ढगे
सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी

डॉ. पी. एस. पाटील,
प्राचार्य
पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,
अमळनेर, जि. जळगांव

2024-25

# आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा – अहवाल

## दिनांक 21 जानेवारी 2025 ते 05 फेब्रुवारी 2025

(कार्यशाळेचा एकूण 7 दिवसाचा कालावधी आहे)

## - अहवाल -

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीच्या पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर जिल्हा जळगाव विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत संदर्भीय पत्रान्वये कबचौउमवि/14/यु.सभा -19/163/2024 दिनांक 08/08/2024 कार्यशाळा व क्षेत्रकार्य भेटीचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात आले.

| अनु. क्र. | साधन व्यक्तीचे नाव पद व पत्ता- | कार्यक्रमाचे/ क्षेत्रकार्याचे ठिकाण, वेळ व दिनांक | विषय- |
|---|---|---|---|
| 01. | श्रीमती अलका पावनगडकर, सामाजिक कार्यकर्त्या, इकोनेट, पुणे | पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय. अमळनेर<br>दिनांक 21 जानेवारी 2025 | एका लग्नाची कोर्टातील गोष्ट, हा इन्फोटेनमेंट कार्यक्रम |
| 02. | मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर.<br>मा. तहसीलदार, अमळनेर | क्षेत्रकार्य भेट - मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर.<br>मा. तहसीलदार, अमळनेर<br>दिनांक 23 जानेवारी 2025 | राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्याने रांगोळी स्पर्धा व चर्चा |
| 03. | प्रा. डॉ. विजेता सिंग, मणियार लॉ कॉलेज, जळगांव | पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय. अमळनेर दिनांक 25 जानेवारी 2025 | कौटुंबिक हिंसाचार कायदा व महिलांविषयी कायदे |
| 04. | श्री नितीन पवार, सहजीवन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अमळनेर येथील सामाजिक कार्यकर्ते | पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय. अमळनेर दिनांक 27 जानेवारी 2025 | सेंद्रिय शेतीचे महत्व व आरोग्य |
|  | श्री मुरलीधर बिरारी, मॅनेजर, स्वामिनी प्रकल्प, आधार बहुउद्देशीय संस्था, अमळनेर. जि. जळगांव | पंचायत समिती हॉल, अमळनेर<br>दुपारी 1:30 वाजता<br>दिनांक 27 जानेवारी 2025 | स्वयंरोजगार, बचत गट व लघुउद्योगाबाबतचे प्रशिक्षण |
| 06 | प्रा डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर, | पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय. अमळनेर दिनांक 31 जानेवारी 2025 | महिला सक्षमीकरण – आवाहने व समस्या |
| 07. | मा.वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, अमळनेर, जि. जळगाव | ग्रामीण रुग्णालय, स्वामीनारायण मंदिराच्या मागच्या बाजूला, अमळनेर जि. जळगाव<br>दिनांक 4 फेब्रुवारी 2025 रोजी ठीक सकाळी 9:30 ते 11:30 | विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिनची तपासणी |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | श्री पुष्पेंद्र शर्मा,<br>व्यवस्थापक<br>आय.डी.एफ.सी. बँक<br>अमळनेर | आय.डी.एफ.सी. बँक<br>अमळनेर | बँकेचे आर्थिक व्यवहार, शिष्यवृत्ती, इंटरनेट बँकिंग |
| 09 | श्री संजय पालकर ,<br>संचालक. सुनेट कॉम्पुटर,<br>स्टेशन रोड, अमळनेर जि.<br>जळगांव | सुनेट कॉम्प्युटर्स, स्टेशन रोड, अमळनेर दिनांक 4 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 12:00 वाजता. | सायबर क्राईम व सोशल मीडिया बाबत ची सुरक्षितता |
| 10 . | मा.पोलीस निरीक्षक,<br>शहर पोलीस स्टेशन,<br>अमळनेर , जि. जळगाव | आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत अमळनेर पोलीस स्टेशन मध्ये समाजकार्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या युवतींना केलं मार्गदर्शन. 5 फेब्रुवारी 2025 | सामाजिक कायदे व Cyber security |
| 11. | समारोप कार्यक्रम 08 फेब्रु. 2025 | **आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा**<br>दिनांक 21 जानेवारी 2025 ते 05 फेब्रुवारी 2025<br>**-कार्यक्रमाचे अध्यक्ष –**<br>प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगांव<br>**-प्रमुख अतिथी-**<br>प्रा.विजयकुमार वाघमारे, IQAC समन्वयक,<br>प्रा डॉ भरत खंडागळे,<br>प्रा डॉ श्वेता वैद्य,<br>डॉ अनिता खेडकर<br><br>प्रा. डॉ. अस्मिता धनवंत सरवैया, विद्यार्थी विकास अधिकारी<br>प्रा. डी. आर. ढगे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी | |

**प्रा. डॉ. अस्मिता धनवंत सरवैया,**
**विद्यार्थी विकास अधिकारी**

**डॉ. पी. एस. पाटील,**

Scanned with OKEN Scanner

**पंडित जवाहलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथे आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा संपन्न...**

अमळनेर **दिनांक 21 जानेवारी 2025** रोजी अमळनेर येथील श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर संचलित पंडित जवाहलाल नेहरू समाजकार्य महविद्यालय, अमळनेर येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विदयार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती अलका पावनगडकर यांचा एका लग्नाची कोर्टातील गोष्ट हा ब्रिटिश कालीन इतिहास कालखंडातील घटनेवर आधारित एक कल्पक असा इन्फोटेनमेन्ट कार्यक्रम प्रभावीपणे अभिनय, प्रोजेक्टर वरून सादर केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथींच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्याअर्पण करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या ओवी गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डॉ अस्मिता सरवैया यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचा युवती सभेच्या माध्यमातून उपक्रम राबविण्यात चा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका सौ. अनुरूपा अभिजीत भांडारकर, प्रमुख अतिथी श्रीमती भारती गाला, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील उपस्थीत होते. सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांनी मुलींनी निर्भीडपणे आयुष्य जगावे, स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहावे, स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे, ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे, असा संदेश त्यांनी आपल्या सादरीकरणातून दिला. अध्यक्षीय मनोगतात सौ. अनुरूपा भांडारकर यांनी विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी वाचन, लेखन केले पाहिजे. स्व जाणीव निर्माण करावी असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी आत्मचरित्र वाचून अंगिकारावी असे आव्हान केले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ अस्मिता सरवैय्या, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी आर ढगे, IQAC समन्वयक डॉ प्रा. विजयकुमार वाघमारे, विभाग प्रमुख डॉ जगदीश सोनवणे, प्रा डॉ भरत खंडागळे, प्रा डॉ सागरराज चव्हाण, प्रा डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर, यांचे सह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी, विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी धनगर या विद्यार्थिनींनी केले, तर आभार प्रदर्शन मोहिनी पाटील या विद्यार्थिनींनी केले.





सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांनी मुलींनी निर्भीडपणे आयुष्य जगावे, या बाबत मार्गदर्शन केले.

ईश्वर महाजन

दैनिक
महाराष्ट्र सारथी
बुधवार, २२ जानेवारी २०२५

# एका लग्नाची कोर्टातील गोष्ट

## सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांचा इन्फोटेनमेंट कार्यक्रम समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथे संपन्न



दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा

अमळनेर । प्रतिनिधी : (ईश्वर महाजन)

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीच्या समाजकार्य महविद्यालय अमळनेर येथे कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ,विदयार्थी विकास विभाग संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली.पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांचा एका लग्नाची कोर्टातील गोष्ट हा ब्रिटिश कालीन इतिहास कालखंडातील घटनेवर आधारित एक कल्पक असा इन्फोटेनमेन्ट कार्यक्रम प्रभावीपणे अभिनय, गाणे , कथा द्वारे प्रोजेक्टर वरून सादकरण केले.अध्यक्ष म्हणून संचालिका अनुरुपा अभिजीत भांडारकर, अतिथी भारती गाला, प्राचार्य डॉ पी एस पाटील उपस्थीत होते .यशस्वितेसाठी डॉ अस्मिता सरवैय्या, प्रा डी आर ढगे, डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर , डॉ जगदिश सोनवणे , दर्शना पवार , पूजा पाटील यांचे सह प्राध्यापक, कर्मचारी, विदयार्थी यांनी सहभाग नोंदविला. सूत्र संचालन कीर्ती सोनवणे रोहिनी धनगर यानी तर आभार प्रदर्शन मोहिनी पाटील यांनी व्यक्त केले.

दैनिक शब्दगंगा।।
५

# एका लग्नाची कोर्टातील गोष्ट

## सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांचा इन्फोटेनमेंट कार्यक्रम समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथे संपन्न



दै.शब्दगंगा वृत्तसेवा

अमळनेर - श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीच्या समाजकार्य महविद्यालय अमळनेर येथे कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ,विदयार्थी विकास विभाग संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांचा एका लग्नाची कोर्टातील गोष्ट हा ब्रिटिश कालीन इतिहास कालखंडातील घटनेवर आधारित एक कल्पक असा इन्फोटेनमेन्ट कार्यक्रम प्रभावीपणे अभिनय, गाणे, कथा द्वारे प्रोजेक्टर वरून सादकरण केले. अध्यक्ष म्हणून संचालिका अनुरुपा अभिजीत भांडारकर, अतिथी भारती गाला, प्राचार्य डॉ पी एस पाटील उपस्थीत होते. यशस्वितेसाठी डॉ अस्मिता सरवैय्या, प्रा डी आर ढगे, डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर, डॉ.जगदिश सोनवणे, दर्शना पवार, पूजा पाटील यांचे सह प्राध्यापक, कर्मचारी, विदयार्थी यांनी सहभाग नोंदविला. सूत्र संचालन कीर्ती सोनवणे रोहिनी धनगर यानी तर आभार प्रदर्शन मोहिनी पाटील यांनी व्यक्त केले.


Scanned with OKEN Scanner

क्षेत्रकार्य भेट - मा. तहसीलदार, अमळनेर मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर.

दिनांक 23 जानेवारी 2025 रोजी अमळनेर शहरातील पंचायत समिती व तहसीलदार कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर युवती सभे अंतर्गत क्षेत्रकार्य भेटीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पंचायत समिती परिसर आणि तहसील कार्यालय परिसरात रांगोळी काढून नव मतदारांना या अभियानात सहभागी करून घेण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. युवतींनी तयार केलेल्या घोषवाक्यांच्या आधारे घोषणा देण्यात आल्या याप्रसंगी मा.तहसीलदार, अमळनेर आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती अमळनेर यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले.


क्षेत्रकार्य भेटीचे आयोजन आणि नियोजन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ अस्मिता सरवैय्या, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी आर ढगे, IQAC समन्वयक डॉ प्रा. विजयकुमार वाघमारे, विभाग प्रमुख डॉ जगदीश सोनवणे, प्रा डॉ भरत खंडागळे, प्रा डॉ सागरराज चव्हाण, प्रा डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर, यांचे सह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी, विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदविला.



**आत्मनिर्भर अभियाना अंतर्गत कौटुंबिक हिंसाचार कायदा व महिलांविषयक असलेल्या कायद्यांवर व्याख्यान संपन्न...**

अमळनेर - **दिनांक 25 जानेवारी 2025** रोजी, पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथे आत्मनिर्भर युवती सभे अंतर्गत मणियार लॉ कॉलेज, जळगांव येथील प्रा. डॉ. विजेता सिंग यांचे कौटुंबिक हिंसाचार कायदा व महिलांविषयी कायद्यांवर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. अस्मिता सरवैया यांनी केले. प्रा डॉ सरवैया यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचा उल्लेख करून, आत्मनिर्भर युवती तयार करण्यासाठी कायद्याची माहिती असणे गरजेचे आहे, जेणेकरून युवती आत्मनिर्भर होण्यास सहाय्यभूत ठरेल. साधन व्यक्ती म्हणून प्रा डॉ विजेता सिंग यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि महिलांसाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती सांगितली. महिला आता अबला राहिल्या नसून, त्या सक्षम झाल्या आहेत. त्यांना कायद्याची माहिती असणे गरजेचे आहे. समाजकार्याच्या विद्यार्थिनी म्हणून समाजात महिलांवर होणारे अन्याय, अत्याचाराविरुद्ध तुम्ही दाद मागू शकतात. किंवा त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू शकतात. याविषयी अतिशय सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा डॉ श्वेता वैद्य यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कायद्याबद्दलचे ज्ञान हे कोणावरही अन्याय होऊ देत नाही, म्हणून संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या अधिकारांचा योग्य वापर करण्याचे विद्यार्थिनींना सुचवले. कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन आणि सूत्रसंचालन प्रा डॉ अस्मिता सरवैया यांनी केले. तर आभार प्रदर्शन कीर्ती सोनवणे या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




Scanned with OKEN Scanner

**महत्व व आरोग्य या विषयावर व्याख्यान संपन्न...**

अमळनेर- **दिनांक 27 जानेवारी 2025** पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय येथे विद्यार्थ विकास विभाग अंतर्गत युवती सभेमध्ये आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळेत दिनांक 27 जानेवारी 2025 रोज सहजीवन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अमळनेर येथील सामाजिक कार्यकर्ते **श्री नितीन पवार** यांन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेती आणि आरोग्य या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. प्रत्येक कुटुंबा सेंद्रिय उत्पादनाचा भरपूर वापर केल्यास मुलींचे व महिलांचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत पेस्टिसाइड चा वाप शेतीत टाळून उत्पादने घेतल्यास नफा जरी कमी दिसत असला तरी शरीरास ते घातक नाही याबाबत चर्चा घडवू आणली. महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात कोणकोणती काळजी घेणे गरजेचे आहे याविषयी सविस्तर मार्गदर्श केले. महिलांमध्ये हिमोग्लोबिन चे प्रमाण, अशक्तपणा, कमी वजन, अधिक श्रम या सर्वांची सांगड घालण्यासाठ सात्विक आहार किती महत्त्वाचा आहे, याविषयी सविस्तर चर्चा केली विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांच उदाहरणांसह उत्तर दिली. विद्यार्थिनींना आत्मनिर्भर होण्यासाठी वैयक्तिक आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्या त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ विकास अधिकारी प्रा डॉ अस्मिता सरवैया, प्रा डॉ अनिता खेडकर प्रा. डॉ. श्वेता वैद्य महाविद्यालयातील विद्यार्थिन आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर युवती योजने अंतर्गत क्षेत्रकार्याला दिली भेट...**

अमळनेर - **दिनांक 27 जानेवारी 2025** रोजी आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळे अंतर्गत प्रत्यक्ष सामाजिक क्षेत्रात जाऊन मध्ये सामाजिक संस्थांना भेटी दिल्या. अमळनेर येथील आधार संस्था अंतर्गत स्वामिनी प्रकल्पाचे मॅनेजर **श्री मुरलीधर बिरारी** यांनी विद्यार्थिनींशी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मुलींनी आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे काळाची गरज आहे. यासाठी आधार बहुउद्देशीय संस्था आणि स्वामिनी प्रकल्प विद्यार्थिनींच्या आणि युवतींच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील आहेत. विद्यार्थिनींच्या अंगी कौशल्य विकास होणे गरजेचे आहे. स्वामिनी प्रकल्प कसा राबवला जात आहे, त्याचे प्रात्यक्षिक देऊन, विद्यार्थिनींना आत्मनिर्भर करण्यासाठी ब्युटी पार्लर शिवणकाम, बचत गट, याविषयी मार्गदर्शन केले. स्वयंरोजगाराच्या संदर्भात बचत गटांच्या माध्यमातून लघुउद्योग प्रशिक्षण दिले जाते. त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बी.एस..डब्ल्यू. व एम.एस.डब्ल्यू. च्या विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनवण्यासाठी कसा उपयोगात येईल या विषयीची सविस्तर माहिती दिली.

Scanned with OKEN Scanner

प्राचार्य डॉ पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ अस्मिता सरवैया, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डी.आर. ढगे यांनी क्षेत्र कार्य भेटीचे आयोजन आणि नियोजन केले.

**महिला सक्षमीकरण - आव्हाने व समस्या प्रा डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर,**

अमळनेर **दिनांक 31 जानेवारी 2025** पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथे आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण - आव्हाने व समस्या यावर डॉ श्वेता वैद्य व डॉ अनिता खेडकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून विद्यार्थिनींना स्वतः सक्षम व्हावे व आपल्या घरात महाविद्यालयात तसेच येणाऱ्या भविष्यकाळात कसे सामोरे जावे याविषयी विविध उदाहरणे देऊन विद्यार्थिनींना अतिशय सखोल असे मार्गदर्शन केले. डॉक्टर वैद्य म्हणाल्याचे विद्यार्थिनी म्हणून आपले पालक गुरुजन वर्ग ज्या विश्वासाने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात पाठवतात त्यांच्या विश्वासात कधीही तडा जाणार नाही, असे वर्तन प्रत्येक विद्यार्थिनीचे असले पाहिजे. तसेच डॉ अनिता खेडकर यांनी देखील विद्यार्थिनींनी स्वयंशिस्त असणे अतिशय गरजेचे आहे, यावर भर देत असताना सांगितले की मुलगी म्हणून आपल्या अनेक मर्यादा आहेत परंतु आपण आत्मनिर्भर होणे काळाची गरज आहे जेणेकरून एक सक्षम पिढी निर्माण करण्यासाठी स्वतः सक्षम होणे गरजेचे आहे यासाठी विद्यापीठाने व राबवलेला हा उपक्रम जास्तीत जास्त सहभाग घेऊन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डी आर ढगे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थिनींना आत्मनिर्भर होण्यास प्रत्येकाने पावले उचलणे गरजेचे आहे, कुठल्याही क्षेत्रात महिलेने मागे राहता कामा नये. कारण या धावपळीच्या व स्पर्धात्मक युगात प्रत्येक विद्यार्थिनीने स्वतःसाठी आपल्या कुटुंबासाठी सक्षम होणे हे महत्त्वाचे आहे आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. अस्मिता सरवैया व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी.आर. ढगे यांनी केले. महाविद्यालयातील IQAC समन्वयक प्रा. विजयकुमार वाघमारे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य लाभले.

**आत्मनिर्भर युवती सभे अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी घेतले आर्थिक व्यवहारासाठी बँकेची कार्यप्रणाली, संगणक, सोशल मीडिया, आणि सायबर क्राईमची माहिती व हिमोग्लोबिनची तपासणी...**

पंडित जवाहरलाल नेहरू **समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथील विद्यार्थी विकास विभागांतर्गत आत्मनिर्भर युवती सभेचा नाविन्यपूर्ण उपक्रम...**


अमळनेर - **दिनांक 4 फेब्रुवारी 2025** रोजी, पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथील विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत आत्मनिर्भर युवती सभेच्या माध्यमातून महाविद्यालयातील बीएसडब्ल्यू

ाणि एमएसडब्ल्यू च्या विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी करून विद्यार्थ्यांना सकस व पोषक आहारा संदर्भात ्रामीण रुग्णालयातील डॉ. तनुश्री दामले व डॉ शिरीन बागवान यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आहारात सकस आणि पौष्टिक हिरव्या पाल्या भाज्यांचा समावेश करावा. कडधान्य प्रोटीन युक्त पदार्थ जेवणात यास नियमित व्यायाम योगासने करण्याचा सल्ला दिला. हिमोग्लोबिनची तपासणी लॅब टेक्निशियन श्री **अमोल महाजन** व आरोग्य कर्मचारी यांनी केली.

महाविद्यालयीन विद्यार्थिनींना क्षेत्रकार्याच्या दुसऱ्या सत्रात आर्थिक व्यवहारांची माहिती व्हावी म्हणून अमळनेर शहरातील. **आय.डी.एफ.सी.** बँक येथे विद्यार्थिनींची विजिट करण्यात आली. बँकेचे व्यवस्थापक **श्री. पुष्पेंद्र** शर्मा यांनी बँकेचे व्यवहार कसे होतात, याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विद्यार्थिनींसाठी शिष्यवृत्ती मिळावी यासाठी बँकेच्या माध्यमातून सेविंग खाते उघडले जातात. एटीएम कार्ड, क्रेडिट कार्ड, चेक बुक, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, इत्यादी अनेक प्रकारच्या सुविधा बँकेकडून पुरविल्या जातात. त्याचबरोबर सेविंग खात्यातून परस्पर पैसे काढून घेऊ नये म्हणून सिक्युरिटी की देखील त्यांनी सांगितल्या. ओटीपी शिवाय कोणताही ट्रांजेक्शन होत नाही, याबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले . बँक कोणत्याही खातेदाराला फोन करून केवायसी संदर्भात किंवा ओटीपी संदर्भात तसेच शिल्लक रक्कमे संदर्भात विचारात नाही. खातेदाराने बँकेच्या संदर्भात कोणतीही माहिती आवश्यक असल्यास, स्वतः बँकेत येऊन माहिती घ्यावी. बँक कुणालाही लिंक पाठवून माहिती भरण्याचा सल्ला देत नाही. अशा कोणत्याही अफवांना व लाभांना बळी पडू नये. विद्यार्थिनींच्या विविध प्रश्नांना शर्माजी आणि बँकेतील कर्मचारी श्रीमती चेतना पाटील व संघपाल झाल्टे यांनी मार्गदर्शन केले. आरटीजीएस, एनएफटी तसेच ऑनलाइन ट्रांजेक्शन, गृह कर्ज, शैक्षणिक कर्ज, पर्सनल लोन, स्कॉलरशिप, अशा विविध सेवा सुविधां बद्दल सखोल मार्गदर्शन केले.

विद्यार्थीनीना अमळनेर येथील **सुनेट कॉम्प्युटर्स, स्टेशन रोड अमळनेर** येथे क्षेत्र कार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष भेट देऊन सूनेट कॉम्प्युटरचे संचालक श्री संजय पालकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, सध्या आर्थिक व्यवहारांमध्ये होणारे सायबर फ्रॉड हा सर्वांसाठीच चिंतेचा विषय आहे. वेगवेगळया प्रकारचे फ्रॉड आणि त्यापासून स्वतःला कसं वाचवायचं याविषयीची विस्तृत माहिती दिली. तसेच सेक्सटॉर्शन काय असते, ओटीपी फ्रॉड, चेहरा बदलून करून फोटो तयार करणे, चेहरा बदलून व्हिडिओ फोन करणे, पोलीस स्टेशनच्या येणाऱ्या खोट्या धमक्या, असे गंभीर विषयावर व्हिडिओच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. क्षेत्रकार्य भेटीच्या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. अस्मिता सरवैया व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी.आर. ढगे यांनी केले महाविद्यालयातील IQAC

समन्वयक प्रा. विजयकुमार वाघमारे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य लाभले.







विद्यार्थींनीना अमळनेर येथील सुनेट कॉम्प्युटर्स, स्टेशन रोड अमळनेर येथे क्षेत्र कार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष भेट देऊन सूनेट कॉम्प्युटरचे संचालक श्री संजय पालकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

Scanned with OKEN Scanner




# आत्मनिर्भर अभियान, विद्यार्थिनींनी दिली बँक, रुग्णालय, संगणक संस्थांना भेट

## अमळनेरच्या पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयात अभियान

प्रतिनिधी | अमळनेर

अमळनेर येथील पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागांतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. समाजकार्य महाविद्यालयातील बीएसडब्ल्यू आणि एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थिनींचे ग्रामीण रुग्णालय येथे हिमोग्लोबिन तपासणी करून विद्यार्थ्यांना सकस व पोषक आहार संदर्भात ग्रामीण रुग्णालयातील डॉ. तनुश्री दामले व डॉ शिरीन बागवान यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आहारात सकस आणि पौष्टिक हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा. कडधान्य प्रोटीन युक्त पदार्थ जेवणात वारंवार नियमित व्यायाम योगासने करण्याचा सल्ला दिला. हिमोग्लोबिनची तपासणी लॅब टेक्निशियन अमोल महाजन व आरोग्य कर्मचारी यांनी केली.

महाविद्यालयीन विद्यार्थिनींना क्षेत्रकार्याच्या दुसऱ्या सत्रात आर्थिक व्यवहारांची माहिती व्हावी म्हणून अमळनेर शहरातील आयडीएफसी बँक येथे विद्यार्थिनींची व्हिजिट करण्यात आली. बँकेचे व्यवस्थापक पुष्पेंद्र शर्मा यांनी बँकेचे व्यवहार कसे होतात, याबाबत सविस्तर माहिती दिली. खातेदाराने बँकेच्या संदर्भात कोणतीही माहिती आवश्यक असल्यास, स्वतः बँकेत येऊन माहिती घ्यावी. बँक कुणालाही लिंक पाठवून माहिती भरण्याचा सल्ला देत नाही. अशा कोणत्याही अफवांना व लाभांना बळी पडू नये, असे मार्गदर्शन केले.

संगणक, डिजिटल साक्षरतेचे

### विद्यार्थिनींना मार्गदर्शन

संगणक, डिजिटल साक्षरता परिचय करणेसाठी विद्यार्थीनींना अमळनेर येथील सुनेट कॉम्प्युटरचे संचालक संजय पालकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. ओटीपी फ्रॉड, चेहरा बदलून करून फोटो तयार करणे, चेहरा बदलून व्हिडिओ फोन करणे, पोलीस स्टेशनच्या येणाऱ्या खोट्या धमक्या, असे गंभीर विषयावर व्हिडिओच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. क्षेत्रकार्य भेटीच्या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. अस्मिता सरवैया व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डी.आर. ढगे यांनी केले. समन्वयक प्रा. विजयकुमार वाघमारे आणि प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

**आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत अमळनेर पोलीस स्टेशन मध्ये समाजकार्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या युवतींना केलं मार्गदर्शन....**

**समाजकार्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या युवतींनी संवेदनशील व जागृत राहण्याचे पोलीस निरीक्षकांनी केले आवाहन...**


अमळनेर - **दिनांक 5 फेब्रुवारी 2025** रोजी सकाळी 11 वाजता अमळनेर शहर पोलीस स्टेशन येथे पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनींची क्षेत्रकार्य भेटीचे आयोजन अमळनेर शहर पोलीस स्टेशन येथे करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक **श्री विकास देवरे** यांचे बुके देऊन सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डी आर ढगे यांनी स्वागत केले. क्षेत्रकार्य भेटीचा उद्देश **प्रा. डॉ. अस्मिता सरवैया** यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितला. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री देवरे यांनी विद्यार्थिनींचा परिचय करून घेतला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे सर्वार्थाने कौतुक केले, युवतींसाठी एवढे सुंदर व्यासपीठ विद्यापीठाने उपलब्ध करून दिल्याने त्यांनी विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना सांगितले की, FIR अर्थात फर्स्ट इन्फॉर्मेशन इन रजिस्टर म्हणजे काय? त्याचा काय उपयोग होतो, जातीय सलोखा राहण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमांची माहिती दिली. सामाजिक उपक्रमांना परवानगी देण्यासाठी पोलीस प्रशासनाची परवानगी आवश्यक असते. याची प्रक्रिया समजून सांगितली. पोलीस निरीक्षक श्री विकास देवरे यांनी विद्यार्थिनींना माहिती सांगितले की, सामाजिक कायद्यांची अंमलबजावणी आणि त्या संदर्भात गुन्ह्याची नोंद करावयाची असल्यास आम्हाला आम्हाला समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची मदत होते. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी ऑनलाईन कोणती पद्धती आहे. त्याची प्रक्रिया समजवून सांगितली. सार्वजनिक ठिकाणी असविधानिक कृती होत असल्यास, सामाजिक कार्यकर्ता म्हणून पोलिसांना इन्फॉर्म करू शकतात. यासाठी त्यांनी टोल फ्री क्रमांक व कंट्रोल रूमचे क्रमांक विद्यार्थ्यांना दिले.


कौटुंबिक हिंसाचार कायदा, बालविवाह कायदा, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, रस्त्यावर होणारे अपघात, बाल लैंगिक शोषण, बाल तस्करी बाबत आवश्यक असलेली मदत, सामाजिक कार्यकर्ता म्हणून पोलीस प्रशासनाची मदत करू शकतात. असेही आव्हान केले. समाजात, प्रशासनात, राजकीय स्तरावर आणि कुठेही, कोणतीही अनुचित घटना घडली तर, सर्वात आधी पोलिस धावून जातात. कुटुंबाला दुय्यम स्थान देऊन आपल्या परीक्षेत्रातील नागरिकांचे संरक्षण आणि त्यांचे संविधानिक हक्कांचे संरक्षण करतात. समाजकार्याच्या विद्यार्थिनी समाजातील समस्यांचे समूह उच्चाटन करण्यासाठी कार्य करावयाचे आहे. त्या दृष्टीने पोलीस प्रशासनासोबत पोलीस मित्र म्हणून देखील काम करू शकतात. डिजिटल अटॅक, डिजिटल अरेस्ट, सायबर सेक्युरिटी, सायबर क्राईम, बँक फ्रॉड यासारख्या आर्थिक गुन्हा संबंधित घटनांचे प्रमाण वाढलेले आहे. यासाठी पोलीस प्रशासनात सायबर क्राईम

Scanned with OKEN Scanner

ब्रँच आणि आर्थिक गुन्हे शाखा या स्वतंत्र ब्रांचेस काम करत आहेत. याचीही माहिती श्री देवरे यांनी दिली. Cyber security बाबत अमळनेर पोलीस स्टेशन मधील कर्मचारी संदीप धनगर, श्री राहुल चव्हाण, सतीश पाटील यांनीही माहिती दिली. सूत्रसंचालन दिव्या महाजन एम एस डब्ल्यू फर्स्ट इयर च्या  विद्यार्थिनीनी केले. व आभार प्रदर्शन दामिनी पाटील एम एस डब्ल्यू फर्स्ट इयर या विद्यार्थिनी केलें.

क्षेत्रकार्य भेटीचे आयोजन, नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी एस पाटील यांच्या मार्गदर्शनातून, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डॉ अस्मिता सरवैया व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी आर ढगे यांनी केले.




Scanned with OKEN Scanner

# आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत पोलीस स्टेशन मध्ये समाजकार्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या युवतींना केलं मार्गदर्शन

अमळनेर - खान्देश एज्युकेशन सोसायटीच्या पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनींची क्षेत्रकार्य भेटीचे आयोजन अमळनेर पोलीस स्टेशन येथे करण्यात आले होते.

यावेळी पो.नि.विकास देवरे यांचे बुके देऊन सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डी.आर.ढगे यांनी स्वागत केले.

क्षेत्रकार्य भेटीचा उद्देश प्रा.डॉ. अस्मिता सरवैया यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितला. पो. नी.देवरे यांनी क.ब.चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे सर्वांनी कौतुक केले, युवतीसाठी एवढे सुंदर व्यासपीठ विद्यापीठाने उपलब्ध करून दिल्याने त्यांनी विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना सांगितले की,



एफआयआर अर्थात फर्स्ट इन्फॉर्मेशन रजिस्टर म्हणजे काय ? त्याचा काय उपयोग होतो, जातीय सलोखा राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमांची माहिती दिली. सामाजिक उपक्रमांना परवानगी देण्यासाठी पोलीस प्रशासनाची परवानगी आवश्यक असते. याची प्रक्रिया समजून सांगितली. सामाजिक कायद्यांची अंमलबजावणी आणि त्या संदर्भात गुन्ह्याची नोंद करावयाची असल्यास आम्हाला समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची मदत होते. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी ऑनलाईन कोणती पद्धती आहे त्याची प्रक्रिया समजावून सांगितली. सार्वजनिक ठिकाणी असंविधानिक कृती होत असल्यास, सामाजिक कार्यकर्ता म्हणून पोलिसांना इन्फॉर्म करू शकतात. यासाठी त्यांनी टोल फ्री क्रमांक व कंट्रोल रूमचे क्रमांक विद्यार्थ्यांना दिले. कौटुंबिक हिंसाचार कायदा, बालविवाह कायदा, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, रस्त्यावर होणारे अपघात, बाल लैंगिक शोषण, बाल तस्करी बाबत आवश्यक असलेली मदत, सामाजिक कार्यकर्ता म्हणून पोलीस प्रशासनाची मदत करू शकतात असेही आवाहन केले. त्या दृष्टीने पोलीस प्रशासनासोबत पोलीस मित्र म्हणून देखील काम करू शकतात. डिजिटल अरेस्ट, डिजिटल अरेस्ट, सायबर सेक्युरिटी, सायबर क्राईम, बँक फ्रॉड यासारख्या आर्थिक गुन्हा संबंधित घटनांचे प्रमाण वाढलेले आहे. यासाठी पोलीस प्रशासनात सायबर क्राईम ब्रँच आणि आर्थिक गुन्हे शाखा या स्वतंत्र ब्रांचेस काम करत आहेत याचीही माहिती विकास देवरे यांनी दिली.

सायबर क्राईम बाबत पोलीस स्टेशन मधील कर्मचारी संदीप धनगर, राहुल चव्हाण, सतीश पाटील यांनीही माहिती दिली. सूत्रसंचालन दिव्या महाजन व आभार प्रदर्शन दामिनी पाटील यांनी केले. क्षेत्र भेटीचे आयोजन, नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. पाटील यांच्या मार्गदर्शनातून, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. अस्मिता सरवैया व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डी. आर.ढगे यांनी केले.

**पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथे आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम संपन्न...**

अमळनेर दिनांक 8 फेब्रुवारी 2025 रोजी पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने पुरस्कृत केलेला आत्मनिर्भर युवती अभियान कार्यक्रमाचा समारोप संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस पाटील यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयातील IQAC समन्वयक प्रा. विजयकुमार वाघमारे, प्रा. डॉ. भरत खंडागळे प्रा. डॉ. श्वेता वैद्य आणि प्रा. डॉ. अनिता खेडकर हे उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमाची प्रस्तावना विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डॉ अस्मिता सरवैया यांनी केली. त्यांनी सांगितले की, दिनांक 21 जानेवारी 2025 रोजी आत्मनिर्भर युती सभे अंतर्गत कार्यक्रमाचे उद्घाटन झाले या सहा दिवसाच्या कार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थिनींनीएका लग्नाची कोर्टातील गोष्ट, हा इन्फोटेनमेंट कार्यक्रम, राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्याने रांगोळी स्पर्धा व चर्चा, कौटुंबिक हिंसाचार कायदा व महिलांविषयी कायदे, सेंद्रिय शेतीचे महत्व व आरोग्य, स्वयंरोजगार, बचत गट व लघुउद्योगाबाबतचे प्रशिक्षण, विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिनची तपासणी, सायबर क्राईम व सोशल मीडिया बाबत ची सुरक्षितता, सामाजिक कायदे व Cyber

Scanned with OKEN Scanner

security यासारख्या अनेक उपक्रमात आपला प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करून त्यांनी आपली प्रस्तावना संपवली. महाविद्यालयाचे महाविद्यालयातील प्राध्यापकांनी युवतींसाठी राबवलेल्या कार्यक्रमाचे कौतुक करून, सर्व विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. क्षेत्रकार्य भेटीच्या माध्यमातून विविध उपक्रमांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती जाणून घेतली तसेच पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, शासकीय कार्यालय, बँका या सर्व संस्थांना भेटी देऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत सांगितले की, विद्यापीठ आणि महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कलागुणांना वाव देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील आहे विद्यार्थिनींनी स्वतःहून पुढे येऊन स्व विकास करून घेण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. तसेच या सहा दिवसाच्या कार्यशाळेच्या निमित्ताने जे जे शिकवलं गेलं आहे, ते आत्मसात करून आपणही समाजातील दुर्लक्षित, तळागाळातील व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन केले.

आत्मनिर्भर युती सभेच्या माध्यमातून प्रतिनिधीक स्वरूपात काही विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. यात प्रामुख्याने, एम एस डब्ल्यू द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी मोहिनी धनगर, बीएसडब्ल्यू द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी तेजस्विनी पाटील, दामिनी पाटील, दिव्या महाजन, रंजना खोंडे, स्नेहल पाटील, चैताली पाटील. कीर्ती सोनवणे, कोमल भामरे, उत्कर्ष पवार, सोनल भोई, या विद्यार्थिनी आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत झालेल्या कार्यक्रमाच्या संदर्भात मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने युवतींना सक्षम करण्यासाठी ज्या कार्यक्रमाची आखणी केलेली आहे हे सर्व कार्यक्रम अतिशय उल्लेखनीय व आत्मनिर्भर करणारे आहेत पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाने विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने जी संधी आम्हाला उपलब्ध करून दिली त्याबद्दल आम्ही ऋण व्यक्त करतो. आम्ही ज्या पद्धतीने आत्मनिर्भर झालेलो आहोत, त्याच पद्धतीने समाजातील वंचित व समस्याग्रस्त महिलांना विद्यार्थिनींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही सामाजिक कार्यकर्ते या नात्याने नक्कीच या उपक्रमाचा वैयक्तिक जीवनात उपयोग करून घेऊ असा विद्यार्थीनिचा सूर होता. समारोप कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डी आर ढगे यांनी केले.

या समारोप कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ अस्मिता सरवैय्या, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डी आर ढगे, IQAC समन्वयक डॉ प्रा. विजयकुमार वाघमारे, विभाग प्रमुख डॉ जगदीश सोनवणे, प्रा डॉ भरत खंडागळे, प्रा डॉ सागरराज चव्हाण, प्रा डॉ श्वेता वैद्य, डॉ अनिता खेडकर, यांचे सह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी, विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदविला.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

विद्यार्थी विकास विभाग

आणि

श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर संचलित,

# पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर जि. जळगांव

नॅक मानांकित 'ब' दर्जा

## युवतीसभा अंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान

## प्रमाणपत्र

श्रीमती/कुमारी ------------------------------------------------

पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथे आपण दि.२१/०१/२०२५ ते दि.०८/०२/२०२५ पर्यंतच्या कालावधी दरम्यान आयोजित युवतीसभा अंतर्गत ***आत्मनिर्भर युवती अभियान*** पूर्णवेळ सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे

**डॉ. अस्मिता धनवंत सरवैया**
विद्यार्थी विकास अधिकारी
कार्यशाळा समन्वयक

**प्रा.डॉ. पी.एस. पाटील**
प्राचार्य
पं.ज.ने. समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर

**डॉ. जयेंद्र लेकुरवाळे**
संचालक
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रा. डॉ. अस्मिता धनवंत सरवैया,
विद्यार्थी विकास अधिकारी

डॉ. पी. एस. पाटील,
प्राचार्य
प. जवाहरलाल नेहरु समाजकार्य
महाविद्यालय अमळनेर जि. जळगा[illegible]

PJN College of Social Work
IQAC
Amalner Dist Jalgaon

**Co-Ordinator**
**IQAC**
PJN College of Social Work
Amalner.Dist Jalgaon

Scanned with OKEN Scanner